## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

---

**रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक मार्गाचे उद्घाटन**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका मेट्रो स्थानक ते निगडी मार्गाचे भूमिपूजन**



आज मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे मेट्रो प्रकल्पातील रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक या ६ किमी मार्गाचे उद्घाटन आणि पिंपरी चिंचवड

महानगरपालिका मेट्रो स्थानक ते निगडी अशा ४.४ किमी उन्नत नवीन मेट्रो मार्गाचे भूमीपूजन पार पडले. हा कार्यक्रम कोलकता येथून व्हिडीओ लिंक द्वारे पार पडला.

मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन पद्धतीने बटन दाबून रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक या मार्गाचे उदघाटन आणि चिंचवड महानगरपालिका मेट्रो स्थानक ते निगडी या प्रकल्पांच्या कोनशिलेचे अनावरण केले आणि त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक या मार्गावरील मेट्रोचे उदघाटन केले.

रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक या मार्गाचे उदघाटन झाल्यामुळे वनाझ ते रामवाडी हा मेट्रो मार्ग पूर्ण झालाअसून यामुळे खऱ्या अर्थाने पुर्व पुणे व पश्चिम पुणे मेट्रोच्या सहाय्याने जोडले गेले आहे. या मार्गिकेमुळे विमान नगर, येरवडा, कल्याणी नगर, चंदन नगर, शास्त्रीनगर, खराडी, वडगाव शेरी , तळेगाव, या भागातील नागरिकांना फायदा होणार आहे. या मार्गिकेमुळे वनाझ ते रामवाडी असा १४.५ किमी चा प्रवास अवघ्या ३६ मिनिटात करणे शक्य होणार आहे. तसेच प्रवासी भाडे ३० रुपये असणार आहे. त्याचबरोबर या रामवाडी स्थानकाच्या परिसरात असणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांना प्रवास करणे सुलभ होणार आहे.



आज भूमिपूजन झालेल्या चिचवड महानगरपालिका मेट्रो स्थानक ते निगडी (४.४ किमी उन्नत मार्ग) या नवीन मार्गिकेवर चिचवड, आकुर्डी आणि निगडी अशी तीन स्थानके आहे. या मार्गिकेमुळे भक्ती शक्ती चौक ते स्वारगेट असा थेट प्रवास करणे शक्य होणार आहे. या मार्गिकेमुळे पुणे व पिपरी चिचवड हि जुळी शहरे पूर्णपणे जोडली जाणार आहेत. या मार्गीच्या जवळ असणाऱ्या निवासी भाग, शैक्षणिक संस्था, औद्योगिक भाग येथील कर्मचारी आणि रहिवासी यांना मेट्रोचा फायदा होणार आहे. चिचवड रेल्वे स्थानक आणि आकुर्डी बस डेपो यांच्याबरोबर एकीकरण केल्यामुळे येथील प्रवाश्याना फायदा होईल.

या कार्यक्रमाला राज्यसभा खासदार सौ. मेधा कुलकर्णी आणि श्रीमती वंदना चव्हाण, लोकसभा खासदार श्री श्रीरंग बारणे, माजी महापौर श्री मुरलीधर मोहोळ, आमदार श्रीमती माधुरी मिसाळ, श्री सुनील टिंगरे, श्री रवींद्र धंगेकर, श्री आणा बनसोडे, श्री महेश लांडगे, माजी आमदार श्री जगदीश मुळीक, माजी नगरसेवक सरस्वती शेंडगे, श्री हेमंत रासने, पुणे विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी श्री. सुहास दिवसे, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री विक्रम कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर, पीएमपीएमल चे सह व्यवस्थापकीय संचालक श्री नितीन नार्वेकर, पुणे मेट्रोचे संचालक श्री अतुल गाडगीळ, श्री विनोद अग्रवाल, श्री अनिल कोकाटे, श्री कार्यकारी संचालक डॉ हेमंत सोनवणे, श्री राजेश द्विवेदी, महाव्यवस्थापक कॅप्टन राजेंद्र सनेर-पाटील हे मान्यवर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर यांनी म्हंटले आहे की,"मा. पंतप्रधानांच्या हस्ते उदघाटन झालेल्या रुबी हॉल क्लिनिक स्थानक ते रामवाडी स्थानक या मार्गिकेमुळे पुर्व पुणे व पश्चिम पुणे मेट्रोच्या नेटवर्कच्या सहाय्याने जोडले गेले आहे. नागरिकांना लांबचा प्रवास करण्याचा फायदा यातून मिळेल आणि चिचवड महानगरपालिका मेट्रो स्थानक ते निगडी हा पुणे मेट्रोच्या मार्गिकेचा नैसर्गिक विस्तार असून यामुळे त्या भागातील रहिवासी भागाला फायदा होईल."

**रामवाडी स्थानक ते पुणे विमानतळ एसी 'एअरपोर्ट शटल बस' सेवेचा शुभारंभ**







या कार्यक्रमाचे औचित्य साधून पुणे मेट्रोच्या 'एअरपोर्ट शटल बस' सेवेचा शुभारंभ करण्यात आला. रामवाडी स्थानक ते पुणे (लोहगाव) विमानतळ अशी एसी बस सेवा पुणे मेट्रो आणि पीएमपीएमल यांच्या सहयोगाने सुरु करण्यात आली आहे. रामवाडी स्थानक ते पुणे विमानतळ चे अंतर ३.५ किमी असून, एका बाजूने भाडे १० रुपये इतके आहे. रामवाडी स्थानक येथून दर २५ मिनिटांनी एअरपोर्ट शटल बस सेवा असणार

आहे. या सेवेमुळे पुणे, कोथरूड व पिपरी चिचवड मधील नागरिकांना पुणे विमानतळावर जाणे व विमानतळावरून घरी जाणे अतिशय सोपे होणार आहे. या बस सेवेला हयात हॉटेल, वेकफील्ड आयटी पार्क, साकोरेनगर,नेक्सा शोरूम, विमाननगर लेन नं २२, विमाननगर लेन नं २१, सिम्बॉयसिस कॉलेज विमाननगर, क्रोम मॉल एअरपोर्ट असे थांबे असणार आहेत. या 'एअरपोर्ट शटल बस' सेवेचा शुभारंभ आमदार श्री सुनील टिंगरे, माजी महापौर श्री मुरलीधर मोहोळ व माजी आमदार श्री जगदीश मुळीक यांनी नारळ फोडून आणि राज्यसभा खासदार सौ. मेधा कुलकर्णी यांनी हिरवा झेंडा दाखवून केला.